

■ ससून रुग्णालयातील अत्याधुनिक 'नवजात शिशू अतिदक्षता विभागा'चे लोकार्पण वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गिरीश बापट यांच्या हस्ते झाले. राज्यमंत्री दिलीप कांबळे, महापौर मुक्ता टिळक, खासदार अनिल शिरोळे, अशोक गोडसे, रितू छाब्रिया, प्रकाश छाब्रिया, डॉ. अजय चंदनवाले आदी उपस्थित होते.

# नवजात अर्भक अतिदक्षता विभाग वैद्यकीय महाविद्यालयांसाठी पथदर्शी - गिरीश महाजन

पुणे, दि. १६ (प्रतिनिधी) - ससून रुग्णालयात सार्वजनिक-खासगी भागिदारीतून उभारलेला नवजात अर्भक अतिदक्षता विभागाचा (एनआयसीयू) प्रकल्प राज्यातील इतर सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांसाठी पथदर्शी आहे. राज्यातील इतर महाविद्यालयांनी असा प्रकल्प राबवावा, अशी सूचना देण्यात येईल, असे मत राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी रविवारी येथे सांगितले.

फिनोलेक्स प्रायव्हेट लिमिटेड, मुकुल माधव फाऊंडेशन, श्रीमंत गणपती हलवाई गणपती ट्रस्ट, कमिन्स इंडिया, सुझलॉन एनर्जी, सिस्का एलईडी यांच्या सहकार्याने ससून रुग्णालयात ५९ खाटांचा 'एनआयसीयू' उभारण्यात आला आहे. अकरा कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या प्रकल्पाचे लोकार्पण रविवारी करण्यात आले. त्यावेळी महाजन बोलत होते.

पालकमंत्री गिरीश बापट, सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, महापौर मुक्ता टिळक, खासदार अनिल शिरोळे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे, मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय संचालक रितू छाब्रिया, फिनोलेक्सचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजय तावरे उपस्थित होते.

महाजन म्हणाले, समाजातील दानशूर व्यक्तींनी आरोग्यसेवेला मदत करण्यासाठी प्राधान्य द्यावे. उद्योगांचा सामाजिक जबाबदारीचा (सीएसआर) निधी देताना शिक्षणाबरोबरच आरोग्याचाही विचार करण्याची गरज आहे. त्यातून समाजातील सामान्य रुग्णांना सरकारी रुग्णालयात अद्ययावत वैद्यकीय सुविधा मिळेल.

बापट म्हणाले, गरीब रुग्ण केंद्रबिंदू मानून ससूनचे डॉक्टर रुग्णसेवा देत आहेत. आरोग्य सुविधांचा 'ससून पॅटर्न' राज्यात सर्वत्र वापरला जावा. शिरोळे म्हणाले, ससून रुग्णालयाच्या कार्यपद्धतीवर टीका करताना सकारात्मक बाबी समोर आणण्याचा अभ्यागत मंडळाच्या माध्यमातून नेहमीच उद्देश राहिला आहे.

डॉ. अजय चंदनवाले, राज्यमंत्री दिलीप कांबळे यांनीही मनोगत व्यक्त केले.